


जेव्हा कुमार शानूचाही सूर बदलतो...



कारकीर्दीचे दशक नुकतेच पूर्ण करणाऱ्या गायक कुमार शानूंनी अमिताभ बच्चन (जादूगर) पासून बॉबी देओल-(करीब) पर्यंत कितीतरी कलाकारांना आपला आवाज दिला. आणि कारकीर्दीत नवेनवे उच्चांक गाठले. या दहा वर्षात भावनेचे अनेक चढउतार त्यांनी अनुभवले. एकीकडे पुरस्कारांची खैरात तर दुसरीकडे विस्कटणारी संसाराची घडी, अशा अवस्थेत त्यांनी स्वतःवरचे संतुलन न हरवता गायनसेवा केली. या दशकपूर्तीच्या निमित्ताने त्यांच्याबरोबर रंगवलेली गप्पांची एक मैफल...

□ विजय अकेला

□ गायक म्हणून दहा वर्षाचा प्रवास कसा वाटला?

– खूपच आनंददायी, यशस्वी नि आकर्षक. फिल्मफेअर पुरस्काराशिवाय इतर बरेच पुरस्कार मी पटकावलेत. मी माझ्या कामावर खूपच प्रभावित आणि समाधानी आहे.

□ म्हणजे चित्रपटातील सध्याच्या परिस्थितीवर समाधानी आहात?

– गुलशनकुमारांच्या हत्येनंतर व्यवसाय आणखीनच ठप्प झाल्यामुळे आधीसारखे रेकॉर्डिंग होत नाहीय. तरीही सध्या आठवड्याभरात पाच सहा गाणी गायला मला मिळतातच.

□ गुलशनकुमार हत्याप्रकरणी तुम्हाला काय वाटते?

– दोस्ती-दुश्मनी सगळ्याच व्यवसायात असते. पण याचा अर्थ असा नव्हे की, तुम्ही कुणाचीही हत्या करावी. ज्याने हे कृत्य केलेय ही त्याची फार मोठी चूक आहे. माझेही त्यांच्याबरोबर प्रेमवैर होते पण मी कधीच कुणाचे जीवनचक्र संपवण्याचा विचार करणार नाही.

□ गुलशनकुमार यांच्या हत्येमुळे संगीत क्षेत्रात वर्षभरात किती फरक पडला?

– फारच, जवळजवळ सहा महिने काम पूर्णपणे बंदच होते, आता कुठे हळुहळू काम सुरू झालेय.

□ एका दिवसात अठ्ठावीस गाणी गावून विक्रम करणारे शानू आज महिन्याला पंचवीसेक गाण्यांवर समाधान मानतात?

– सुरूवातीपासूनच मी संख्येपेक्षा गुणवत्तेलाच महत्त्व देत आलोय. आता मी आणखीनच चोखंदळ झाल्यामुळे जास्त गाणी स्वीकारत नाही निवडक गाणीच करतो.

□ चोखंदळ असण्याचा अर्थ निवडक बॅनर्स व दिग्गज निर्माते-संगीतकार यांच्याबरोबरच काम करण्याचा नव्हे?

– मी चांगल्या गाण्यांबरोबर चांगल्या संगीतकाराचीही अपेक्षा करतोच. मात्र याचा अर्थ असा नाही की मी नव्या लोकांबरोबर काम करणे योग्य मानत नाही.

□ तुमची गीत रचना कशी झालीय हे तुम्हाला कसे कळते?

– चांगले गीत आणि चांगली धून यांच्याबरोबर माझे अगदी जवळचे संबंध आहेत. त्यांची मला नीट ओळख आहे. त्यामुळेच उत्तम गाणे कोणते सुमार कोणते हे कळायला मला वेळ नाही लागत.

□ याचा अर्थ संगीत न आवडल्यास तुम्ही गाणी गायला नकार देता?

– होय. जर एखादे गाणे मला योग्य वाटले नाही तर तुम्ही दुसऱ्याकडून गाववून घ्या असे मी स्पष्ट सांगतो. अशी बरेचशी गीते मी नाकारलीत.

□ यामुळे त्यांची निराशा होत असेल नाही?

– त्यांची निराशा तर होतेच, पण मी त्यांना प्रेमाने समजावतो की, मी गीतांवर अन्याय करू शकत नाही.

□ गुणवत्तेवरच भर देण्याचा विचार अचानक तुमच्या मनात कसा नि कधी आला?

– गुणवत्तेबाबत मी नेहमीच जागरूक असतो. *परदेस* आणि *दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे* या दोन्ही चित्रपटात माझी दोनेक गाणीच चित्रपटातील इतर गाण्यांपैकी उत्कृष्ट ठरली.

□ काही वर्षीपूर्वी ऐंशी ते नव्वद टक्के चित्रपटात शानूंचीच गाणी असायची आणि बहुतेक गाणी हिट व्हायची. आज तशी

